# आकाशवाणी नागपूर,
# (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शनिवार, दिनांक १५ जून २०२४

## ठळक बातम्या

1. भारतीय चित्रपट क्षेत्राच्या वाढीसाठी केंद्रसरकार वचनबद्ध - माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल. मुरुगन यांचं मिफ मध्ये प्रतिपादन.
2. पंढरपूर इथं यावर्षीपासून आषाढी एकादशीला श्री विठ्ठलासोबतच रुक्मिणी मातेची देखील शासकीय पूजा होणार.
3. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाला तिकीट तपासणीतून जून महिन्यात १३ जून पर्यन्त जवळजवळ १ पूर्णांक ४० कोटींचा महसूल प्राप्त.

आणि

4. बव्हंशी विदर्भात तापमान ४० अंशच्यावर, हवामानात उकाडा कायम.

*****

माहिती प्रसारण राज्यमंत्री एल.मुरुगन

चित्रपटांमुळे मनोरंजन होतं, त्याबरोबरच आर्थिक वाढ आणि रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात. भारतीय चित्रपट क्षेत्राच्या वाढीसाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी दिली आहे. 'मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'बिली अँड मॉली:अँन ऑटर लव्ह स्टोरी' या उद्घाटनाच्या चित्रपटावेळी ते बोलत होते. या महोत्सवाला येता आलं याचा आनंद आहे, अशा भावना व्यक्त करून त्यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. भारताला आशय निर्मितीचं जगातलं केंद्र म्हणून उभं करण्याचं सरकारचं धोरण आहे. परदेशी निर्मात्यांनी भारतात येऊन चित्रीकरण करावं, यासाठी सरकार प्रोत्साहन देत आहे. या दृष्टीने दिल्या जाणाऱ्या अनुदानात गेल्या वर्षी वाढ करण्यात आली आहे, असंही मुरुगन यांनी सांगितलं. माहितीपट, लघुपट, अॅनिमेशन निर्मात्यांनी इथे यावं, इथे चित्रीकरण करावं असं आवाहन त्यांनी केलं. यंदा मिफमध्ये ५९ देशांमधून ६१ भाषांमधले एकंदर ३१४ लघुपट, माहितीपट आणि अॅनिमेशनपट दाखवण्यात येणार आहेत. दरम्यान 18व्या 'मिफ' महोत्सवात दिला

जाणारा प्रतिष्ठेचा व्ही.शांताराम जीवनगौरव पुरस्कार वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना दिला जाणार असल्याची घोषणा माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी आज नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेश इथं केली.

रुक्मिणीमातेची शासकीय पूजा

पंढरपूर इथं यावर्षीपासून आषाढी एकादशीला श्री विठ्ठलासोबतच रुक्मिणीमातेची देखील शासकीय पूजा होणार आहे. आषाढी यात्रेत सहभागी होण्यासाठी रुक्मिणीमातेचं माहेर म्हणून ख्याती असलेल्या अमरावती मधल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर इथून पालखीनं काल प्रस्थान केलं. ४३० वर्षांची परंपरा असलेल्या या पालखीला मानाची पालखी म्हणून महत्व आहे. या मंगल सोहळ्याकरता सर्वधर्मीय  नागरीक मोठ्या संख्येनं  उपस्थित होते. दरम्यान, पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्याना वीस हजार रुपयांचं अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. पालखी सोहळ्याच्या नियोजनासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. वारकऱ्यांसाठी गटविमा, जादा एसटी गाड्या, पथकरमाफी, इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत.

पालखी

पंढरपूरवारी साठी निघलेला संत गजानन महाराज यांचा पालखी सोहळा दोन दिवसाच्या प्रवासानंतर आज सकाळी अकोल्यात दाखल झाला आहे. भौरद इथं मुक्कामी असलेली पालखी सकाळी डाबकी रोड वर असलेल्या खंडेलवाल महाविद्यालयात पोहोचली. सहभोजन घेतल्यानंतर दोन दिवस राजराजेश्वर नगरीत 'गण गण गणात बोते' चा गजर ऐकू येणार आहे. यंदा पालखीचे ५५ वे वर्ष आहे. उद्या सकाळी ६ वाजता पालखी पुढील प्रवासासाठी प्रयाण करणार आहे.

इटलीचा दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी  इटलीचा दौरा आटोपून आज नवी दिल्लीला परतले. हा दौरा अतिशय फलदायी झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. या दौऱ्यात जागतिक नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा झाली, असं त्यांनी सांगितलं. जागतिक समुदायाला लाभदायक ठरतील अशा प्रभावी उपाययोजना

आखण्यासह भावी पिढीसाठी एका उत्तम जगाची निर्मिती करण्यासाठी सर्वांनी वचनबद्धता दर्शवली, असंही ते म्हणाले.

यूजीसी
यावर्षी उच्चशिक्षण संस्थांमधले प्रवेश तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा हस्तांतरित केल्यास त्या संस्थांना पूर्ण शुल्क परत द्यावं लागणार असल्याचा निर्णय, विद्यापीठ अनुदान आयोग - यूजीसीनं घेतला आहे. यूजीसीनं २०२४-२५ या वर्षासाठी शुल्क परतावा धोरण जाहीर केलं असून, त्यात पूर्ण परताव्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. प्रवेश रद्द केल्यास किंवा तो मागं घेतल्यास शुल्क परत मिळत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी केल्याच्या पार्श्वभूमीवर यूजीसीनं हे धोरण जाहीर केलं. केंद्रीय किंवा राज्य सरकारांच्या अखत्यारीतल्या उच्च शिक्षण संस्था, यूजीसीनं मान्यता दिलेल्या संस्था, अभिमत विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू होणार आहे.

माओवादी
छत्तीसगडच्या बस्तर परिसरात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत आज ८ माओवादी मारले गेले.अबुझमाडच्या जंगलात माओवादी सक्रीय असल्याची खबर मिळाल्यावरुन ITBP, जिल्हा राखीव पोलीस आणि विशेष कृती दलाच्या संयुक्त पथकानं शोधमोहिम सुरु केली होती. त्यादरम्यान ही चकमक झाली. शोधमोहिम अद्याप सुरु आहे. सुरक्षा दलाचे दोन जवानही चकमकीदरम्यान जखमी झाले आहेत.

मध्य रेल्वे
मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने जून महिन्यात 13 जून पर्यंत, तिकीट तपासणी महसुलात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या दरम्यान विभागाला तिकीट तपासणी मधून ₹1.39 कोटीचा प्रभावी महसूल नोंदवला गेला आहे. 1 जून 2024 ते 13 जून 2024 या कालावधीत, समर्पित तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी सुमारे 20 हजार 803 प्रवासी शोधून काढले जे विना तिकीट प्रवास करत होते, अनियमित प्रवास करत होते किंवा बुकिंग न करता सामान घेऊन जात होते.

## योग दिन

येत्या २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होणार असून, त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ट्विटरवर अर्ध चक्रासनावरील एक चित्रफीत प्रसारित केली आहे. निरोगी हृदय आणि रक्त प्रवाह सुरळीत राहण्यासाठी या आसनाचा सराव करण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे.

## साहित्य अकादमी पुरस्कार

साहित्य अकादमीचे २०२४ या वर्षासाठीचे बाल साहित्य पुरस्कार आणि युवा पुरस्कार आज जाहीर झाले. मराठीत भारत सासणे यांच्या समशेर आणि भूत बंगला या कादंबरीला बाल साहित्याचा हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तर युवा पुरस्कारात देविदास सौदागर लिखित उसवण या कादंबरीची निवड झाली आहे.

## विष्णू मनोहर

शाळेतील परसबागेत तयार झालेल्या लालभोपळा, दुधीभोपळा, शेवगा इत्यादी भाज्या आता मध्यान्ह भोजनाला अधिक पौष्टिक करणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे केवळ शारीरिकच नाही तर शेतीसोबतच भाज्या कुठे आणि कशा लागतात इत्यादी ज्ञान मिळाल्यामुळे बौद्धिक पोषणदेखील होणार आहे अशी माहिती शेफ विष्णू मनोहर यांनी दिली. सरकारी शाळांमध्ये शैक्षणिक सत्र **2024-25** पासून तांदूळ, डाळ, शेंगदाणे आणि भाज्यांसह कडधान्ये आणि स्वीट डिश असा एकुण **15** पौष्टिक पदार्थांचा समावेश असलेला 'पोषण आहार' लागू करण्यात आला आहे.

## किमान विक्री दर

साखर कारखान्यांकडून घेतल्या जाणाऱ्या घाऊक साखरेच्या किमान विक्री दरात ३१ वरून ४२ रुपये प्रतिकिलो पर्यंत वाढ करण्याची मागणी, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानं केंद्र सरकारकडे केली आहे. महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी, साखर उद्योगासंदर्भात महासंघाच्या बैठकीनंतर, काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गेल्या काही वर्षांपासून उसाच्या एफआरपीमध्ये सातत्यानं वाढ केली जात आहे; मात्र त्या तुलनेत साखरेची किमान विक्री किंमत कायम आहे, त्यामुळे साखर कारखान्यांचं आणि पर्यायानं ऊस उत्पादक

शेतकऱ्यांचंही नुकसान होत असल्याचं ते म्हणाले. साखर उद्योगाच्या वाटचालीशी संबंधित आगामी दहा वर्षांचा व्यापक आराखडा तयार करण्याचं काम महासंघ सध्या करत असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

हवामान

विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये अद्यापही उकाडा कायम आहे. नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये तापमान **40** अंशाच्या वर आहे. नागपुरात गेल्या **24** तासात **41.2** अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यांपैकी अमरावती, अकोला, बुलढाणा**,** वाशिम, यवतमाळ या सर्व ठिकाणी सरासरी तापमान **40** अंशाच्या च्या दरम्यान आहे. येत्या **19** तारखेपर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यादरम्यान सोसाट्याचा वारा वाहू शकतो. दरम्यान, **18** आणि **19** तारखेला पश्चिम विदर्भात बुलढाणा, अकोला**,** अमरावती आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, येत्या काही तासात अमरावती, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

टी-ट्वेंटी

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना कॅनडासोबत होणार आहे. फ्लोरिडा इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. तर दुसरा सामना रात्री साडे दहा वाजता इंग्लंड आणि नामिबिया दरम्यान होणार आहे.आज झालेल्या अन्य सामन्यांमध्ये दक्षिण आफ्रिकेनं नेपाळचा केवळ एका धावेनं**,** तर न्यूझीलंडनं युगांडाचा नऊ गडी राखून पराभव केला.

*****